जा.क्र./उविमगु/292/२०२३
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिधुदुर्ग.
दिनांक : 17 FEB 2023

प्रति,

..................................
..................................
..................................
..................................

**विषय : औषधी व सुगंधित वनस्पतींचे नेमप्लेट तयार करून देणेचे दरपत्रक सादर करणेबाबत.**

महाशय,

वरील विषयाबाबत असे कळविण्यात येते की, उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे करीता खालीलप्रमाणे औषधी व सुगंधित वनस्पतींचे नेमप्लेट तयार करावयाचे असुन दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | **साईज** | **अंदाजित खरेदी नग** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| १ | डिजिटल फोमशीट नेमप्लेट | २ x १ चौ. फुट | ५० | प्रति चौ. फुटाचा दर नमुद करावा |

याबाबत आपणास विनंती करण्यात येते की, कृपया आपण वरील तपशिलाप्रमाणे **औषधी व सुगंधित वनस्पतींचे नेमप्लेटचे** दर नमुद करुन याबाबतचे दरपत्रक या कार्यालयात **दि.** 07/03/23 प्राप्त होईल अशा तऱ्हेने सादर करावे. उशिरा प्राप्त होण्याऱ्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

**दरपत्रकाबाबत अटी खालीलप्रमाणे.**

१) दरपत्रक बंद लखोटयातून सादर करावे व त्यावर " **औषधी व सुगंधित वनस्पतींचे नेमप्लेट दरपत्रक"** असे स्पष्ट नमुद करावे.

२) दरपत्रकात दिलेले दर हे सर्व करांसहीत स्पष्टपणे नमुद करावे.

३) दरपत्रकातील दर हे साहित्य उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ कार्यालयास पोहोच देण्याचे असावे.

४) दरपत्रक सहयोगी अधिष्ठाता, उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग – ४१६५२० या पत्यावर पाठवावे.

५) दरपत्रकात या दरपत्रकाच्या संदर्भाचा उल्लेख असावा.

६) टपालद्वारे दरपत्रक पोहोचण्यास विलंब झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

७) सर्व दरपत्रके मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे.

८) दरपत्रकावर जी. एस. टी. नंबर नमुद करणे अत्यंत आवश्यक आहे.

आपला विश्वासू

**सहयोगी अधिष्ठाता**
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग